जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४३९ दिनांक - १७/०६/२०२३**

## शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे शहर

## संचेती रुग्णालय व शिवाजीनगर पोलीस स्टेशन यांचे संयुक्तपणे पोलीसांकरीता मोफत ऑर्थोपेडीक तपासणी शिबीर आयोजित केलेबाबत

सध्याच्या धावपळीच्या जिवनात मानवाला हाडांचे आजार सर्वच कुटुंबात जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. विशेषःता जेष्ठ व्यक्तींना हाडांच्या अनेक समस्या उदभवतात वय वाढताना ह्या समस्या वाढू नये यासाठी लवकर काळजी घेतली पाहीजे तर हे आजार टाळणे शक्य आहे. विशेषता मनके व गुघड्यांच्या समस्या असतात हाडांच्या आजारांबाबत पुण्यातील संचेती हॉस्पीटल जागतिक पातळीवर प्रसिध्द आहे.

या मोफत ऑर्थोपेडिक शिबीरात बोनमिनरलडेन्सिटी मोफत तपासणी हाड्यांच्या कॅल्शियम मस्तर तपासणी, ईसीजी तपासणी, रक्तदाब तपासणी संचेती रुग्णालयाच्या ऑर्थोपेडिक डॉक्टरांनी आणि संचेती रुग्णालय फिजीओथेरपीपी निदेशकांच्या सल्ल्याशी संवाद करण्याची सुविधा उपलब्ध केले होती.

संचेती रुग्णालयातील ह्या मोफत ऑर्थोपेडीक शिबीरामार्फत २०० पेक्षा अधिक पोलीस अधिकारी व अंमलदार यांना लाभ मिळाला आहे. पुणे शहरातील विविध पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी लाभ घेतला आहे.

मोफत ऑर्थोपेडिक शिबीराचे उद्‌घाटन मा. संदीपसिंह गिल्ल, पोलीस उप आयुक्त परि-१ पुणे शहर यांचे मान्यतेने डॉ. पराग संचेती (चेअरमन संचेती रुग्णलाय पुणे), मा. सहा. पोलीस आयुक्त,श्री. वसंत कुवर आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरविंद माने, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. विक्रम गौड यांच्या द्वारे केले गेले.

वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असताना प्रत्येकाने सेवाभाव ठेवला पाहीजे. रुग्णसेवा हीचे ईश्वर सेवा हे ब्रीदवाक्य ठेवून आम्ही कार्यरत आहोत. यापुढेही कार्यरत राहा, असे प्रतिपादन संचेती हॉस्पीटलचे चेअरमन डॉ. पराग संचेती यांनी केले.

डॉ.पराग संचेती व संचेती हॉस्पीटलने समाजासाठी व पोलीस विभागासाठी सुरु केलेले मानवतावादी कार्य असेच पुढे चालू ठेवावे असे प्रतिपादन मा. सहा. पोलीस आयुक्त, वसंत कुंवर यांनी केले.

मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांनी हाडांचे आजार आपल्या भारतीय जीवन शैलीमध्ये आणि कोविड-१९ नंतर खुपच वाढले आहे अशा काळामध्ये संचेती हॉस्पीटलच्या टिमने पोलीस कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करून आमचे कर्मचाऱ्यांना ह्या संधीचा लाभ मिळून दिल्याने आभार व्यक्त केले.

सदर शिबीर यशस्वी होण्याकरीता सहा.पोलीस निरीक्षक श्री.बाजीराव नाईक,श्री.उत्तम माने, डॉ.चौबे, अजिनाथ रोठे,श्री रोहीत जठार,श्री.विजय कासार यांनी परिश्रम घेतले.




sancheti
HOSPITAL
शिवाजीनगर पोलीस स्टेशन, शिवाजीनगर, पुणे
द्वारा
भारतातील सुप्रसिध्द
संचेती इन्स्टिट्युट फॉर ऑर्थोपेडीक ॲण्ड रिहॅबिलीटेशन, पुणे
यांचे तर्फे
मोफत अस्थिरोग तपासणी शिबीर
उद्घाटन समारंभ
दि. १७ जुन २०२३
श्री. संदिपसिंग गिल्ल
भा.पो.से.
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ - ०१, पुणे शहर
डॉ. पराग संचेती